## प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

## सोमवार, दिनांक २२ जुलै २०२४

### ठळक बातम्या

1. **२०२३-२४ वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल आज लोकसभेत सादर- जीडीपी वाढीचा दर साडेसहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज.**
2. **वेतन आणि निवृत्ती वेतनात सुधारणा करण्यासाठी 8वा केंद्रीय वेतन आयोग स्थापन करण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचा केंद्र सरकारचा पुनरुच्चार.**
3. **शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या वतीनं आजपासून २८ जुलैपर्यंत राज्यात शिक्षण सप्ताह साजरा केला जाणार.**
4. **नागपूर जिल्हयातील प्रतिपंढरी श्री विठ्ठल रुखमींनी देवस्थान धापेवाडा इथं प्रतिपदेनिमित्त भाविकांची दर्शनासाठी गर्दी.**
5. **विदर्भाच्या भंडारा आणि गोंदिया जिल्हयामध्ये आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट, विदर्भात सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात पावसाची हजेरी.**

****

**अधिवेशनाला प्रारंभ**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून प्रारंभ झाला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२३-२४ या गेल्या आर्थिक वर्षाचा, आर्थिक पाहणी अहवाल सदनासमोर सादर केला. चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प त्या उद्या लोकसभेत सादर करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातला हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. दरम्यान, हे अधिवेशन सकारात्मक आणि सृजनात्मक व्हावं, अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. ते आज अधिवेशनाला प्रारंभ होण्यापूर्वी संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलत होते. स्वातंत्र्याच्या अमृतकाळातला हा अर्थसंकल्प देशाच्या पुढच्या पाच वर्षांचं चित्र स्पष्ट करणारा असेल असा विश्वासही, पंतप्रधानांनी व्यक्त केला. सर्व राजकीय पक्षांनी आपली पक्षीय धोरणं बाजूला ठेवून पुढच्या साडेचार वर्षांसाठी स्वतःला देशासाठी समर्पित करण्याचं आवाहन देखील मोदी यांनी यावेळी केलं.

**आर्थिक सर्वेक्षण अहवाल**

२०२३-२४ च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात, आर्थिक वर्ष २०२४-२५ वर्षासाठी सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर, साडेसहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आज  लोकसभेत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. जागतिक स्तरावर आर्थिक कामगिरीत अनिश्चितता असताना  आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशांतर्गत वाढीला चालना देणाऱ्या घटकांमुळे आर्थिक वाढीला मदत मिळाली असल्याचं अहवालात म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं आर्थिक वर्ष २०२५ साठी चलन फुगवट्याचा दर, साडेचार टक्के आणि  आर्थिक वर्ष २०२६ साठी, चलनफुगवट्याचा दर चार पूर्णांक एक दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

**वेतन आयोग**

केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि निवृत्ती वेतनात सुधारणा करण्यासाठी आठवा केंद्रीय वेतन आयोग स्थापन करण्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचा पुनरुच्चार, आज सरकारनं केला. लोकसभेत लेखी उत्तर देताना वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी म्हणाले की, जून २०२४ मध्ये आठव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या स्थापनेसाठी दोन निवेदनं प्राप्त झाली आहे. परंतु सध्या असा कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नाही, असंही चौधरी यांनी सांगितलं.

**नीट-धर्मेंद्र प्रधान**

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रम प्रवेश पात्रता परीक्षा-नीट यूजीमध्ये देशभरात सरसकट पेपरफुटी झाल्याचा विरोधकांचा आरोप केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी फेटाळून लावला. देशभरातल्या चार हजार सातशे परीक्षा केंद्रांपैकी फक्त पाटणातल्या एका केंद्रावर पेपरफुटीचा प्रकार समोर आल्याचं, प्रधान यांनी सांगितलं. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हा मुद्दा उपस्थित करत, सरकारवर टीका केली होती. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात न्याय प्रविष्ट असून, यासंदर्भात केंद्रीय अन्वेषण विभाग-सीबीआयकडून तपास सुरू असल्याचं प्रधान यांनी नमूद केलं.

**बिहार स्टेटस**

बिहारला 'विशेष राज्याचा' दर्जा बहाल करण्यात येणार नाही असं आज अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत दिलेल्या उत्तरात स्पष्ट केलं. राष्ट्रीय विकास परिषदेद्वारा डोंगराळ आणि अवघड भूप्रदेश, लोकसंख्येची कमी घनता किंवा आदिवासी लोकसंख्येचं मोठ्या प्रमाणावर वास्तव्य, शेजारील देशांच्या सीमेवरील मोक्याचे स्थान, मागासलेपण आदी घटकांचा विचार करून विशेष श्रेणी दर्जा बहाल केला जातो. या निकषानुसार विशेष श्रेणी दर्जाबाबत बिहारच्या विनंतीवर २०१२ मध्ये, आंतर-मंत्रालयीन गटानं आपला अहवाल सादर केला होता, ज्यानुसार बिहारला विशेष श्रेणी देता येणार नाही असं, चौधरी म्हणाले. खासदार रामप्रीत मंडल यांनी याबाबतीत प्रश्न विचारला होता.

**जात प्रमाणपत्र**

२०२४-२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याचा निर्णय शासनानं घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यां पुढील अनेक अडचणी कमी होणार आहे.

**नाना पटोले**

राज्यात मराठा-ओबीसी आरक्षणाचा वाद महायुती सरकारनंच सुरु केला असून, २०१४ साली पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस आघाडी सरकारनं, मराठा समाजाला आरक्षण दिले होतं पण त्यानंतर सत्तेत आलेल्या फडणवीस सरकारनं मराठा आरक्षणाच्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर केलं नाही म्हणून ते आरक्षण गेलं असा आरोप, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत केला. पटोले म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर विरोधी पक्षांनी त्यांची भूमिकाही स्पष्ट केलेली आहे. आता निर्णय घेण्याची जबाबदारी ही सरकारची आहे पण सरकार जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहे असा आरोप त्यांनी केला.

**वडेट्टीवार**

गृहप्रकल्प न राबविलेल्या एका खासगी विकासकाला पंतप्रधान आवास योजनेच्या नावाखाली राज्य सरकारनं बिनव्याजी ४०० कोटी रुपये मंजूर केलेत. त्यामुळ आता मुख्यमंत्री लाडका कंत्राटदार नंतर मुख्यमंत्री लाडका बिल्डर योजना महाराष्ट्रात येणार आहे का, अशी खरमरीत प्रश्नात्मक टीका विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर केली आहे. या प्रकरणी गृहनिर्माण विभागानं असा निधी देण्यास विरोध दर्शविला. त्यानंतरही हा निधी देण्यासाठी कोण दबाव आणतंय याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी, प्रचितगड या आपल्या शासकीय निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत केली.

**शिक्षण सप्ताह**

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या वतीनं आजपासून २८ जुलैपर्यंत शिक्षण सप्ताह पाळला जाणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत सादर केलेल्या, प्रभावी शैक्षणिक सुधारणा आणि सहयोग यांना प्रोत्साहन देणं, हे या सप्ताहाचं उद्दीष्ट आहे. या कालावधीत, अध्यापन-शिक्षण साहित्य दिवस, पायाभूत साक्षरता, संख्याशास्त्र, क्रीडा दिवस आणि सांस्कृतिक दिवस साजरे केले जाणार आहेत.

**धापेवाडा**

विदर्भाचे पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपूर जिल्ह्याच्या कळमेश्वर तालुक्यातील धापेवाडा इथल्या श्रीविठ्ठल रुखमींनी देवस्थान इथं आषाढी प्रतिपदेनिमित्त, यात्रेचं दरवर्षी आयोजन करण्यात येत. यानिमित्य महापूजेचं देखील आयोजन करण्यात आलं होतं. आज पहाटे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसंच कुटुंबियांच्या उपस्थितीत विठ्ठलपूजा करण्यात आली. अशी अख्यायिका आहे की, एकादशीला विठ्ठल पंढरपूरला भक्तांना दर्शन देतो आणि प्रतिपदेला विदर्भाच्या धापेवाडामध्ये आपल्या लाडक्या भक्तांना दर्शन देतो. आज प्रतिपदेनिमित्त, स्वयंभू श्रीविठ्ठल रुखमींनी देवस्थान इथल्या गर्भगृहाला आकर्षक फुलांनी सजविण्यात आलं होतं. भक्तांनी दिंडी पालखी घेऊन आज, विठ्ठल दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

**आरटीई प्रवेश प्रक्रिया**

बालकांचा मोफत आणि सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियमानुसार उद्यापासून, प्रवेश प्रक्रियेला सुरवात होणार आहे. एस.एम.एस. येणाऱ्या पालकांनी दिनाक एकतीस जुलैपर्यंत गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे कागदपत्रे पडताळणी करून प्रवेश निश्चित करावा असं, आवाहन करण्यात आलं आहे. बालकांचा मोफत आणि सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, दरवर्षी आर.टी.ई. २५ टक्के प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते.

**पाऊस मदतकार्य**

२० जुलै रोजी आलेल्या पावसामुळे नागपूर शहरातील अनेक भागात पाणी जमा झाले होते. या बाधित भागांमध्ये मनपाद्वारे शनिवारपासून मदतकार्य सुरु आहे. नागपूर महानगरपालिकेचे अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग, उद्यान विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, हिवताप व हत्तीरोग विभाग या सर्व विभागांद्वारे समन्वयाने मदत आणि सेवाकार्य करण्यात येत आहे. दरम्यान, नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी आज शंकरनगर परिसराची पाहणी करीत स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. याप्रसंगी आमदार विकास ठाकरे व भागातील नागरिक उपस्थित होते. चौधरी यांनी धरमपेठ झोनच्या अधिकाऱ्यांसोबत इंदिरा गांधी रुग्णालय ते शंकरनगर दरम्यानच्या बाभुळकर मार्गाचा दौरा केला आणि नाग नदीच्या काठावर असलेल्या झोपड्या तत्काळ हटविणायचे निर्देश दिले. याशिवाय तुटलेली सीवर लाइन तात्काळ दुरुस्त करून पुलाची दुरूस्ती करावी, रस्त्यावर आलेल्या झाडांच्या फांद्या कापाव्यात आदी निर्देश देण्यात आले.

**हवामान**

विदर्भाच्या भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यामध्ये आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यात देखील मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. याशिवाय उर्वरित विदर्भात अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ या ठिकाणी वादळी पर्जन्यमानासह हलक्या पावसाची शक्यता आहे.दरम्यान, उद्या संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट राहणार असून, परवा पूर्व विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात हेच वातावरण कायम राहणार आहे. आज मुसळधार पावसाची

शक्यता असल्यानं, नागपूर जिल्ह्यातील शाळा महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली होती. त्याच प्रमाणे भंडारा जिल्ह्यात देखील पावसाचा रेड अलर्ट असल्यानं शाळा महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. गेल्या २४ तासात भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर इथं सर्वाधिक 163.1 मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, त्या पाठोपाठ नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात १४२ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. अकोल्यात काल मध्यरात्री पासून रिमझिम सुरु असून, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात काल 31.33 टक्के जलसाठा जमा झाला होता. वाशीम जिल्ह्यात देखील काल  हलक्या पावसाची नोंद झाली. गडचिरोली जिल्ह्यात आज पावसानं थोडी विश्रांती घेतल्यानंतर दुपारपासून पुन्हा पावसाची रिपरिप सुरुच आहे. भामरागड नजीकच्या पर्लकोटा नदीचा पूर ओसरला असून, तिथले जनजीवन पूर्वपदावर येत असून, गोसेखुर्द धरणातून होणारा पाण्याचा विसर्ग वाढवून तो तीन लाख ५४ हजार क्यूसेक्स करण्यात आला आहे तर ३३ मार्गांवरील वाहतूक अजूनही ठप्पच आहे.

*****